BOOK-POST

KARANDI 25-?-88 PUNE

जा.क्र. जिप/माध्य/ह-४/१९८८-८९
माध्यमिक विभाग
पुणे जिल्हा परिषद, पुणे
दि. ~~१२-९~~ १० -१९८८.

प्रति,
अध्यक्ष
श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ
करंदी ता शिरूर, जि पुणे

विषय- जून ८७ पासून शासन मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता कळविणेबाबत.

आपल्या संस्थेच्या करंदी ता शिरूर. येथील माध्यमिक शाळेस जून १९८७ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तरी यापुढे शासन आदेश, परिपत्रके इत्यादी पत्रव्यवहारासाठी आपल्या शाळेचे नाव व संपूर्ण पत्ता या कार्यालयास आवश्यक असल्याने माहिती त्वरित पाठविण्याची विनंती आहे.

(signature)
शिक्षणाधिकारी
जिल्हा परिषद, पुणे (माध्य.)
पुणे-१.

दि. २४-९-८८

(२८)

(२)

23/ Nov / 1987

जा.क्रं. माध्य-३/१४/अनधिकृत शाळा/[illegible]
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक:-

प्रति,

सेक्रेटरी
श्री ५० - शिक्षण - प्रसारक मंडळ,
करंदी ता. शिरूर-

विषय:- अनधिकृत माध्यमिक शाळा तपासणी नुसार खास बाब म्हणून जून १९८७ पासून संमतीसह नियमित मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा म्हणून समजण्याबाबत......

संदर्भ :-शासनाचे पत्र क्रमांक- (एसएसएन-१०८७/११९५/(७-आरसी)-१
दि. १६-७-८७

अनधिकृतपणे चालु असलेल्या ज्या माध्यमिक शाळांचे बाबतीत ज्या ठिकाणी सदर माध्यमिक शाळा चालु राहणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी शाळा सुरू केली आहे. व ज्या अनधिकृत शाळांचे बाबतीत जागा शिक्षक वर्ग, शैक्षणिक कार्य इत्यादी बाबत किमान अटी व . शर्तींची पूर्तता होत आहे. अशा अनधिकृत माध्यमिक माध्यमिक शाळा विचारात घेऊन आपल्या संस्थेमार्फत चालविण्या-या येणा-या खालील माध्यमिक शाळांना संबंधित शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन शासनाचे उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये जून १९८७ पासून मराठी माध्यमाचे माध्यमिक शाळेस विना अनुदान तत्वावर / इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर पुढील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खास बाब म्हणून परवानगी देण्यात आलेली आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. | ५. |
| श्री [illegible] शिक्षण प्रसारक मंडळ, करंदी | करंदी ता. शिरूर | ८वी ते १०वी | मराठी | विना-अनुदान तत्वावर |

(९)

२.....

(2)



अ] या माध्यमिक शाळांना [कन्या प्रशालेला देखील] कोणत्याही प्रकारचे अनुदान अनुज्ञेय नाही.

ब] सदर माध्यमिक शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थेची आर्थिक स्थिती पूर्णपणे समाधानकारक असणे आवश्यक आहे.

<u>तसेच खाली नमूद केलेल्या बाबीं आवर्जून पूर्तता करणे आवश्यक आहे.</u>

१] संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमांखाली नोंदलेली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या माध्य. शाळांपैकी कोणत्याही शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेने अर्जाच्या फी सह रीतसर अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

६] शासनाची मंजूरी नसताना माध्य. शाळा चालू ठेवल्याबाबत त्या शैक्षणिक संस्थांनी नियमबाह्यपणे नियतपूर्व प्रत्येक वर्षी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरणे आवश्यक आहे.

तरी याबाबत वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद ——पुणे—— यांचे मार्फत या कार्यालयास उलट टपाली पाठवावा.

मान्य टिपणी प्रमाणे

[signature]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता.

प्रत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद ——पुणे—— यांना माहिती व त्वरित कार्यवाहीसाठी रवाना.

२. त्यांनी वरील शाळेसंबंधी वर नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता संस्थेने केली आहे किंवा कसे याची खात्री करून मगच आपला अहवाल या कार्यालयास पाठवावा.

प्रत मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तारभवन मुंबई-३२ यांना सविनय सादर.

प्रत मा. शिक्षण संचालक, महा. राज्य, पुणे १ यांना सविनय सादर.

(2)

(30) (3)

"यशवंतराव कल्याण भावन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)

जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/अनुदान९२.९३
पुणे, दि. १/१०/९२

प्रति,

सचिव,
श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, करंदी.
ता. शिरूर

विषय :- टप्प्याटप्प्याने अनुदान मंजूर करणेबाबत.
१९९२.९३

संदर्भ :- मुख्या. विद्या विकास मंदीर, करंदी.
प्रस्ताव क्र. — दि. —

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्या विकास मंदीर, करंदीच्या विद्यालयास सन ९१.९२ मध्ये ७५% टक्के अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. आपल्या प्रशालेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल पहाता आपल्या विद्यालयास जून ९२ पासून १००% टक्के अनुदान मंजूर करणेत येत आहे. तरी आपण १ जून ९२ पासून आपल्याकडे सेवेत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक मान्यता या कार्यालयाकडून घेवून वेतन देयके वेतनपथकाकडे सादर करावीत.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,
१) मा. शिक्षण संचालक, महा.राज्य पुणे १.
२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.
३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाहनिधी पथक, पुणे यांना योग्यत्या कार्यवाहीस्तव.
२/- १ मार्च ९३ पासूनचा अनुज्ञेय असलेला अनुदानावरील खर्च ९३.९४ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतूदीतून करणेत यावा.
४) मुख्याध्यापक,
विद्या विकास मंदीर, करंदी
ता. शिरूर

(3)

कृ. मागे पहावे

सन ९३.९४ मध्ये मंजूर करणेत आलेल्या अनुदान ~~माध्यमिक~~ शाळा.

| अनु.क्र. | शाळेचे नाव | वर्ग | टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १. | विद्या विकास मंदीर करंदी. ता. शिरुर | इ.८वी ते १०वी (३ वर्ग) | १००%. |

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (माध्य.)
जा. क्र./शिक्षण/माध्य/ह-४/पुवि-८३
पुणे-१. दिनांक २२/२/८३.

प्रति,

मुख्याध्यापक,
विद्या विकास मंदीर, करंदी.
ता. शिरूर, जि. पुणे.

विषय - इ. ५वी ते ७वी वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करणेबाबत.

संदर्भ - मा. शि. उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र. माध्य-२/२४७७६/५वी ते ७वी/पुवि-८३ दि. १४/२/८३.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविणेत येते की आपल्या माध्यमिक शाळेत जून ८३पासून इ. ५वी च्या वर्ग सुरू करण्यास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर परवानगी देणेत येत आहे.

अटी - १) इ. ५वी च्या वर्गाची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहील.

२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३) तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

तसेच आपण आपल्या विद्यालयातील इ. ५वी च्या वर्गाची वार्षिक तपासणी ग. शि. अ. यांचेकडून करून त्यांचा तपासणी अहवाल या कार्यालयाकडे पाठवावा.

दु. दु. देशपांडे
शिक्षणाधिकारी (माध्य)
पुणे जिल्हा परिषद, पुणे